प्रेसनोट दि. १२/०६/२०१९

**" अंमली पदार्थ विक्री करण्या-या सराईत गुन्हेगारास गुन्हे शाखे कडुन गांजा सहित पकडले"**

अंमली पदार्थ विरोधी पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक बापु रायकर हे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते यांचे मार्गदर्शनाखाली, सोबतचे पोलीस स्टाफसह हडपसर पोलीस ठाणेचे कार्यक्षेत्रात पेट्रोलींग करीत असताना, ते मांजरी, पुणे येथील घुले वस्ती जवळुन वाहणा-यील छोटा जुना कॅनालचे कडेला रोडवर, सार्वजनिक ठिकाणी आले. त्यावेळी यापुर्वी हडपसर भागात सराईतरित्या गांजा विक्री करणारा रेकॉर्ड वरिल गुन्हेगार नामे राणु पांडुरंग राखपसरे, वय ५१ वर्षे, रा. घुले वस्ती, छोटा जुन्या कॅनलचे कडेला, मांजरी, पुणे हा किंमत रुपये ३२,९००/-चा १ किलो ४२० ग्रॅम 'गांजा' जवळ बाळगताना मिळुन आला. म्हणुन सहाय्यक पोलीस निरीक्षक बापु रायकर व त्यांचे साबतचे पोलीस स्टाफने त्यास जेरबंद केले. त्याचे विरुध्द पोलीस हवालदार महेंद्र पवार यांनी हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा रजि. नंबर ५४८/२०१९ एन. डी. पी. एस. ॲक्ट कलम ८(क) २०(ब)(ii)(ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. त्यास मा. न्यायालयात हजर करुन त्याची दिनांक १४/०६/२०१९ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड घेण्यात आलेली आहे. अधिक तपास हडपसर पोलीस ठाणे, पुणे हे करीत आहेत.

सदरच्या कारवाई मा. श्री. अशोक मोराळे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा. श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, यांचे सुचने प्रमाणे व मा. श्री. भानुप्रताप बर्गे सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री राजेंद्र माहिते, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बापु रायकर, पोलीस उप निरीक्षक सुभाष तागड, सहाय्यक पोलीस फौजदार प्रविण शिर्के, अर्जुन दिवेकर, पोलीस हवालदार महेंद्र पवार, प्रफुल्ल साबळे, महिला पोलीस नाईक हेमा ढेबे, पोलीस शिपाई सचिन चंदन, योगेश मोहिते यांनी सहभाग घेतला आहे.